# प्रथा - काही उपआख्याने

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

*(प्रत्येक 'तो' / 'ती' वेगळे आहेत.)*

- तो मुंबईच्या एका दूरच्या उपनगरात लहानाचा मोठा झाला. हुशार होता पण चांगली शाळा त्या गावात नव्हती. त्यामुळे त्याची संभाव्य बौद्धिक क्षमता अव्यक्तच राहिली. शाळा, मग कॉलेज तेथेच सुरू झाले. सायन्स कॉलेजचे दुसरे वर्ष महत्त्वाचे असे. त्यात मिळणाऱ्या गुणांवर पुढे डॉक्टर किंवा इंजीनियर होण्याच्या कॉलेजमध्ये प्रवेश ठरतो. एक प्रथा अशी की आपल्याला चांगले मार्क मिळणार नाहीत असे ठरवून काही जण या वर्षांत 'ड्रॉप' घेतात. म्हणजे ते वर्ष सोडून देतात आणि पुढच्या वर्षी तुफान अभ्यास करून जास्त मार्क मिळवू आणि हव्या त्या पदवीला प्रवेश मिळवू असा प्लॅन आखतात. परीक्षेत बसल्यावर एखादा पेपर अर्धवट सोडून देतात म्हणजे नापास व्हावे. उरलेल्या पेपर्सना हजरच रहात नाहीत.

याने हा प्रयोग केला. त्यामुळे आई-वडिलांना आश्चर्य वाटले. पण तेव्हा करण्यासारखे काहीच नव्हते म्हणून याच्यावर भरोसा टाकला. पुढच्या वर्षी याने त्याच्या मते चांगली परीक्षा दिली पण हवे तेवढे मार्क मिळाले नाहीत. आता त्याच कॉलेजात जायचीही लाज वाटू लागली. म्हणून त्याने दूरच्या एक कॉलेजमध्ये शालान्त परीक्षेच्या गुणांवर प्रवेश घेतला. यामुळे तीन वर्षे वाया गेली आणि नव्या कॉलेजमध्ये पुढची चार वर्षे काढल्यावर हातात बी. एस्सी. ही पदवी मिळाली.

कॉलेजसाठी तो होस्टेलमध्ये राहायचा. तेथे एकाशी ओळख झाली. तो मुलगा ड्रग्जचे नियमित सेवन करत असे. त्यामुळे त्याची बुबुळे आक्रसत होती. त्याच्या स्वप्नातला भारत म्हणजे अफूच्या शेतात सगळे जण धुंद होऊन पडले आहेत. यानेही एक-दोनदा ड्रग्जचा अनुभव घेतला पण दोन चन्द्र दिसणे अशा दृश्यानंतर नशेच्या आहारी गेला नाही.

होस्टेलमध्ये आणखी एक मुलगा होता. तो शिकाऊ शास्त्रज्ञ होता. मोठ्या केंद्रीय संस्थेत काम करत असे. हे जबाबदारीचे, गोपनीय माहिती असणारे संवेदनाशील पद होते. २४ तास तो कोठे काय करत आहे हे संस्थेला माहिती असणे आवश्यक असे. त्यासाठी त्याला विशिष्ट प्रकारचा फोन दिलेला असे. एकदा हा, शास्त्रज्ञ आणि एक मित्र होस्टेलजवळच्या एका रेस्टॉरंटमध्ये संध्याकाळी गेले. शास्त्रज्ञाने हे काही ऑफिसला कळवले नव्हते. ते बियर पीत असताना अचानक रेस्टॉरंटवर पोलिसांची धाड आली. पोलिसांना ड्रग्जच्या व्यापारासंदर्भात काहीतरी माहिती मिळाली असावी. त्यांनी रेस्टॉरंट बंद केले. शास्त्रज्ञाला घाम फुटला. पोलिसांच्यात अडकलो तर नोकरी तर जाणारच शिवाय नाचक्की. त्याने संस्थेचा फोन, स्वतःचे ओळखपत्र घट्ट मुठीत आवळले. ते करून काही उपयोग होणार नाही हे माहीत असूनही. कारण तो घाबरला होता. पण पोलिसांनी गिऱ्हाइकांना मागच्या दाराने बाहेर काढले आणि मंडळी सुटली. ह्याचे कॉलेज, होस्टेलही वाचले..

कॉलेजमध्ये तो कविताही करत असे. एक दोन मोठ्या मराठी कवींकडून त्याला प्रोत्साहनही मिळाले होते.

त्याच्या पदवीला नोकरी मिळायच्या दृष्टीने फारशी किंमत

नव्हती. अखेर वडिलांनी ते नोकरीला होते त्या जवळच्या मोठ्या फॅक्टरीत प्रथेप्रमाणे वशिल्याने याला चिकटवून घेतला. तरी अधूनमधून तो हे काय आपले आयुष्य अशा विचाराने अस्वस्थ होत असे. आता वेगळ्या मार्गाने जावे असा विचारही करत असे. लिखाण करावे असे त्याला फार वाटे. त्याचे वाचन चांगले होते. मराठी आणि इंग्लिश. वर्तमान घटनांचाही मागोवा तो घेत असे. एक मित्र एका चांगल्या इंग्रजी मासिकाचा उपसंपादक होता. त्याच्या ओळखीने त्याने त्या मासिकात एकदा एक लेखही छापून आणला. पण गाडी तेथेच अडली.
मग याची नोकरी चालू राहिली. अधूनमधून वडिलांकडून प्रथेप्रमाणे कान झिणझिणवणारे अपमानही चालू राहिले. मुलांचा अपमान अधूनमधून करायचा हीही एक प्रथाच..

दरम्यान लग्नाचे वय झाले. 'आई-वडिलांना सून हवी आहे, मला बायको नको' असे काही काळ हा प्रथेप्रमाणे म्हणत असे. पण यथावकाश प्रथेप्रमाणे आयोजित लग्न झाले. बायको ग्रामीण महाराष्ट्रातील होती. याच्यापेक्षा जास्त शिकलेली होती. याचा फोटो बघूनच तिने याला वरला होता त्यामुळे लग्न हा तसा उपचारच होता. लग्ने स्वर्गात ठरलेली असतात या उक्तीचेच हे उदाहरण! सून म्हणून ती याच्या आई-वडिलांनाही पसंत पडली. हाही सुखाने नांदू लागला.

यथावकाश समांतर प्रथेप्रमाणे बायको नोकरी करेल आणि तो संपूर्ण वेळ लिखाण करेल अशी योजना त्याने बायकोकडून मान्य करून घेतली. त्याला अधूनमधून स्वयंपाकही येत असे. म्हणजे ती आज जे काम करते ते तो करणार. पण बायको उच्चशिक्षित असली तरी तिला नोकरी मिळणे अवघड होते. प्रथेप्रमाणे तिने ट्यूशन्स घेण्याचा प्रयत्न केला. पण फक्त एक मुलगा त्यासाठी काही काळ येत असे. मग हा प्लॅन फसला.

यथावकाश त्याला त्या नोकरीचा कंटाळा येऊ लागला. वडिलांच्या वाशिल्याने नोकरी लागली ही रुखरुखही होतीच. नोकरी तर आवश्यक होती. मग त्याने गुजरातमधील वापी नावाच्या गावी नोकरी मिळवली. यथावकाश त्यांना एक मुलगीही झाली. आता तो प्रथेप्रमाणे कुटुंबप्रमुख झाला आणि प्रथेप्रमाणे बायको-मुलगी यांच्या प्रतिपाळाची जबाबदारीही आली. मग पर्यायी व्यवसायाचे विचारही मनात येईनात. त्यात भर म्हणून वापीमधील प्रदूषण करणाऱ्या उद्योगधंद्यांमुळे तब्येत चांगलीच बिघडली. पाणी, हवा, भाज्या सगळेच रासायनिक प्रदूषणाने संपृक्त होते. अखेर ती नोकरीही सोडण्याची वेळ आली. मग महाराष्ट्रातच चिपळूणला एक नोकरी मिळाली. कुटुंब तेथे रवाना झाले. पण काही काळातच ती कंपनी बंद पडली. किराणा दुकानदार उधारीवर माल देईना, ही धोक्याची सूचना मिळाली. या बिकट परिस्थितीत कशीबशी एक नोकरी हैदराबादला मिळाली आणि मंडळी तिकडे रवाना झाली.

त्याला बायकोत काहीच उणीव कधीच दिसली नाही. हे जरा तर्कदुष्ट असले तरी दोघांनाही एकमेकांत काहीही आक्षेपार्ह वाटू नये ही प्रथाच आहे. 'ती निरिच्छ आहे' असा त्याचा प्रामाणिक विश्वास होता. असा दांभिकपणा हा त्याच्या स्वभावाचा भाग होता. त्यामुळे त्यांचा संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले. प्रथेप्रमाणे अशा लोकांचा 'आमचे कुटुंब स्वयंपूर्ण' असा निश्चित ग्रह असतो, ते लोक त्यांच्या कुटुंबांतर्गत घडामोडी, ताणतणाव चुकूनही इतरांना सांगत नाहीत. तो ग्रह त्याचाही होता. त्याला जोडून त्याने आपला जुना छंद कायम ठेवला. तो म्हणजे सगळ्या ओळखीच्या आणि नातेवाईकांच्या बातम्या काढायच्या, त्या आणि विशेषतः त्यांचे उणेदुणे, अंतर्गत कलह जगभर करायचे. कोणत्या तरी नातेवाईकांत भाऊ-बहिणीचे कसे फाटले, एक चुलतभाऊ त्याच्या गावाला गेले तरी नेहमी बाहेरच भेटतो, घरी कसा कधीही बोलवत नाही, दुसऱ्या भावाचा कॉलेजातील मुलगा पांघरूण डोक्यावरून घेऊन रात्री तासन् तास फोनवर कसा असतो, आधीच्या फॅक्टरीतील एक जण कसा दुसऱ्या गावाला स्थायिक झाला आणि दारूच्या आहारी गेला, इत्यादी. म्हणजे स्वतःच्या कुटुंबाच्या परिपूर्णतेचा दृढग्रह आणि इतरांबद्दल अखंड कडबा चघळणे हे एकमेकांना पूरक घटक होते.

नव्या कंपनीत पगार चांगला असल्याने त्याने कर्ज काढून मुंबईजवळ एक फ्लॅट घेतला.

दरम्यान एका मुलग्याचाही जन्म झाला. तो अगदी लहान असताना त्याचे मेंदूचे ऑपरेशन जरूरीचे झाले. त्याला त्यांनी जवळच्या एका मोठ्या स्टील फॅक्टरीच्या हॉस्पिटलमध्ये नेले. ऑपरेशन टेबलवर घेऊन डॉक्टरने चौकशी केली की तो तेथे नोकरीला आहे का. नाही कळल्यावर त्यांना हाकलून दिले. मग वणवण करत एक हॉस्पिटल शोधले आणि ऑपरेशन करून घेतले. या आजाराने मुलगा जरा मंद झाला असे त्यांना तेव्हा वाटले पण सुदैवाने तो नॉर्मल राहिला. यथावकाश वडिलांना हृदयविकार झाला. त्यासाठी प्रथेप्रमाणे सांगोवांगी कोणीतरी बडोद्याला एका विशिष्ट ठिकाणी ट्रीटमेंटसाठी जा असे सुचवले. ते काही याला जमले नाही. नंतर एकदा ते सकाळी बाहेर फिरायला गेले ते गेलेच. ओळखीच्या कोणीतरी घरी ही बातमी दिली. त्यांना बडोद्याला न नेल्याबद्दल तो स्वतःला आयुष्यभर दोष देत असे.

थोरली मुलगी हुशार निघाली. तिने चिकाटीने भारतात अर्थशास्त्राची पदवी घेऊन अमेरिकेत स्कॉलरशिप मिळवली आणि तिथल्याच एका भारतीय मुलाशी लग्न केले. आता त्याचा संसार हा सुखाचा सुरू झाला. तोच त्याला स्वतःला हृदयविकाराचे निदान झाले. आधीपासून मधुमेह होताच. तो घाबरट माणूस या निदानाने खचला. प्रथेप्रमाणे आपल्याला डॉक्टर बरोबर औषधे देत आहे ना याचे गूगलवर संशोधन केले. युरोप, अमेरिकेत जी औषधे देतात तीच त्याला मिळत होती असे कळले. पण काही निराळ्या कारणाने प्रथेप्रमाणे डॉक्टर बदलला. जुनी औषधे नव्या नावाने चालू झाली. रोज नेमाने तो वजन पाहात असे. एक ग्रॅम वरखाली आणि धसका! बरोबर बघितले का, पुन्हा काट्यावर उभा राहात असे, बायकोला बोलावत असे, मग काल्पनिक पतंग उडवत असे - डॉक्टर, तपासण्या, ऑपरेशन, इत्यादी. आठवड्यात एकदा तरी हा कार्यक्रम असे.

एक दिवस कंपनीच्या कामासाठी त्याला रामेश्वरला जायला लागले. तेथे सेमिनारमध्ये बोलायला तो उभा राहिला आणि कोसळला तो शेवटचाच. तो साठ वर्षांचाही नव्हता. हार्ट अॅटॅक आला होता का मेंदूत रक्तस्राव झाला हे कळले नाही. मग आई आणि बायको तेथे रवाना झाल्या. त्याच्या एका काकूलाही जायचे होते पण त्या विमानाचे तिकीट मिळाले नाही. शिक्षण-नोकरी-लग्न-मुले-आजारपण-लवकर मृत्यू. अशी मजा!

- ती पुण्यातल्या एका चांगल्या शाळेत शिकली. हुशार होती. पुढे तज्ज्ञ डॉक्टर झाली. बरोबरच्याच एका डॉक्टरशी प्रथेप्रमाणे विवाह ठरला. साखरपुडा झाला आणि वराने मन बदलले. लग्न कॅन्सल झाले. प्रथेप्रमाणे एका डॉक्टरला दुसरा डॉक्टर उभा राहिला आणि लग्न झाले.
दोघेही एकाच विषयातील तज्ज्ञ डॉक्टर होते. नवऱ्याच्या वडिलांनी शहराच्या चांगल्या एरियात मोठा प्लॉट घेऊन ठेवला होता. त्यांच्या निवर्तनानंतर याने तेथे ओनरशिप फ्लॅट्सची इमारत बांधून घेतली. एका मजल्यावर हॉस्पिटल, एका मजल्यावर काही भागात त्यांचे घर, वरच्या मजल्यावरील एक फ्लॅट आणि गॅरेज आपल्याकडे ठेऊन बाकीचे फ्लॅट्स विकले. यथावकाश त्यांना दोन मुली झाल्या आणि संसार हा सुखाचा ते अमृतात नहाले.

नवरा डॉक्टर म्हणून आणि माणूस म्हणूनही सचोटीचा नव्हता. ऑपरेशन जरूरीचे आहे का नाही हा विचार न करता तो आला पेशंट की ऑपरेशनला घ्यायचा. सल्ला देण्यात मिळायचा त्याच्या काही पटीत ऑपरेशनमध्ये पैसा मिळायचा. भारतात डॉक्टर्सची cut practice ही फोफावली आहे. एक डॉक्टर आवश्यक असो वा नसो, पेशंटला दुसऱ्या डॉक्टरकडे पाठवतो. तो डॉक्टर जे पैसे मिळवतो त्यात याचा कट म्हणजे कमिशन असते. एकमेका साह्य करू अवघे साधू परमार्थ - परमार्थ म्हणजे अक्षरशः परम अर्थ - जास्त पैसा.
म्हणजे नैतिक कसोटीवर तो अगदीच अनैतिक होता. पण

नवरा, नंतर बाप म्हणून कर्तव्यदक्ष होता. तिने या भूमिकांची तिला सोयीस्कर विभागणी केली आणि नवरा ही भूमिका हा संभाळतो ना, बस झाले असे सुरुवातीपासूनच ठरवले. त्याच्या डॉक्टरकीच्या उद्योगात तो काही का करेना. शिवाय पैसा तर हवाच असतो.

यथावकाश मुली मोठ्या झाल्या, व्यवस्थित शिकल्या, थोरली प्रथेप्रमाणे अमेरिकेला गेली. दुसरीने प्रथेप्रमाणे बॉयफ्रेंड मिळवला. आणि हिला कॅन्सर झाला. ती दीर्घकालीन आणि महागडी ट्रीटमेंट याने जबाबदारीने संभाळली. हॉस्पिटलमध्ये असताना तिला कॉलेजमध्ये शिकवणाऱ्या एक शिक्षिका तिला आवर्जून भेटायला आल्या याचा तिला आनंद झाला. विशेष म्हणजे या बाईंचे लग्न ठरले आणि अपघातात पाय गेला. तरी त्या माणसाने त्यांच्याशीच लग्न केले. त्यामुळे बाई सगळ्याच मुलींच्या आवडत्या होत्या. शिक्षकांच्या अशा खासगी गोष्टी शाळा-कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना फार कौतुकाच्या असतात. त्या एकमेकांना वारंवार सांगणे ही प्रथा. बाई कुबड्या घेत किंवा व्हीलचेअरवर असत.
परत कॅन्सरग्रस्त डॉक्टरकडे येता, ती आणि तिचा नवरा दोघेही डॉक्टर असूनही कॅन्सरतज्ज्ञांनी प्रथेप्रमाणे पुरेसे पैसे उकळले. तुमच्याकडून म्हणून कमीच पैसे लावले असेही आश्वासन दिले. ती बरी झाली असे प्रथेप्रमाणे ठासून जाहीर केले.

दरम्यान सासू-सून यांच्यातील संघर्ष प्रथेप्रमाणे वाढू लागले. त्यात सासूला वयोमानानुसार शारीरिक आणि मानसिक गंभीर विकार होऊ लागले. मग यांनी तिला वरच्या एका स्वतंत्र फ्लॅटमध्ये एकटी राहाण्यासाठी हलवले. साधारण बऱ्या काळात त्यांचे आयुष्य चालू राहिले.

इतरांचे लक्ष वेधण्यासाठी आत्महत्या करणे ही एक समांतर प्रथा असते. कधी कधी उद्देशानुसार आत्महत्या अयशस्वी होते. एक दिवस यांच्याबरोबर राहाणाऱ्या धाकट्या मुलीने आत्महत्या केली. ती त्यात गेली. आत्महत्या इतरांना कायमच अचानक असते. ती यांनाही होती. त्या दुर्घटनेतून सावरण्यासाठी दोघे जण अमेरिकेतील मुलीकडे काही काळासाठी गेले.

परत आल्यावर हिला पुन्हा कॅन्सरचे निदान झाले. आधीचा ट्रीटमेंटचा उपक्रम चालू राहिला.

**– पुरन्दरे चन्द्रशेखर**

purandarearts.com
artnondeco@yahoo.co.uk

**मुक्त शब्द सर्व प्रकारच्या मुक्तिदायी व परिवर्तनवादी विचारव्यूहांचा आदर करते.**